उसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती प्रकल्पांकरीता निश्चित केलेल्या उद्दिष्टांबाबत अभ्यास करण्यासाठी समिती .

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अपाऊ - २०१५ / प्र.क्र. ५२६ / ऊर्जा-७**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २० नोव्हेंबर, २०१५.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.अपाऊ-२००७/प्र.क्र.६९३/ऊर्जा-७, दि.१४ ऑक्टोबर, २००८
२) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्र.पवन-२०१०/प्र.क्र.१३४/ऊर्जा-७, दि.१४ जुलै, २०१०.
३) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्र.अपाऊ-२०१४/प्र.क्र.१४४/२०१४/ ऊर्जा-७, दि.३० ऑगस्ट, २०१४.
४) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्र.अपाऊ-२०१५/प्र.क्र.४९/ऊर्जा-७, दि.२० जुलै, २०१५.

**प्रस्तावना : -**

शासनाने नवीन व नवीकरणीय ऊर्जा म्हणजे अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांच्या विकासासाठी वेळोवेळी प्रोत्साहनात्मक धोरणे जाहीर केली आहेत. या धोरणांमुळे राज्यात स्वच्छ व पर्यावरण पोषक अशा नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीचे प्रकल्प मोठ्या प्रमाणात कार्यान्वित झाले आहेत. अशाप्रकारे राज्यात जाहीर केलेल्या अशा धोरणांमुळे दि.३१.३.२०१४ अखेर सुमारे १३५५ मे.वॅ. क्षमतेचे ऊसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती प्रकल्प विकसित झाले आहेत.

दि.१४.१०.२००८ च्या शासन निर्णयान्वये ऊसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मितीचे १००० मे.वॅ. क्षमतेचे प्रकल्प उभारण्याचे निश्चित केलेले उद्दीष्ट पूर्ण झाल्याने त्या प्रकल्पांचा विकास जलद गतीने होण्यासाठी ऊसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मितीमध्ये १००० मे.वॅ. अतिरिक्त क्षमता वाढ करण्याचा निर्णय, दि.३०.८.२०१४ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आला आहे.

तद्नंतर संदर्भाधीन दि.२०.७.२०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्याचे नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीचे एकत्रित धोरण-२०१५ जाहीर केले असून सदरहू धोरणामध्ये ऊसाच्या चिपाडावर/कृषि अवशेषांवर आधारित सहवीज निर्मितीचे १००० मे.वॅ. एवढया क्षमतेचे प्रकल्प उभारण्याचे उद्दिष्ट निश्चित केलेले आहे.

तथापि, सहवीज निर्मितीचे १००० मे.वॅ. क्षमतेचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याने नवीन वीज खरेदी करार करता येणार नाही, अशी भूमिका महावितरण कंपनीने घेतल्याचे राज्य साखर संघाने शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे. सबब, सहवीज निर्मिती प्रकल्पासाठी निश्चित केलेले आणि साध्य केलेले उद्दीष्टांबाबत सर्वंकष विचार करुन अतिरिक्त क्षमता वाढ करण्यासंदर्भात योग्य ती शिफारस करण्यासाठी समिती नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

१. ऊसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती प्रकल्पांसाठी यापूर्वी राज्य शासनाने निश्चित केलेले उद्दीष्ट, महाऊर्जाने दिलेली मुलभूत सुविधा संमती आणि महावितरण कंपनीने केलेले वीज खरेदी करार यांचा सविस्तर आढावा घेऊन नवीन सहवीज निर्मिती प्रकल्प प्रस्तावांना मंजुरी देण्यास नवीन अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण २०१५-अंतर्गत आणखी क्षमता वाढविणे शक्य आहे किंवा कसे, यासंदर्भात राज्य शासनास योग्य ती शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| सौ.अनुराधा भाटिया, संचालक (वित्त), एमएसईबी सूत्रधार कंपनी | - | **अध्यक्ष,** |
| कार्यकारी संचालक, महानिर्मिती कंपनी, प्रकाशगड, मुंबई | - | सदस्य, |
| कार्यकारी संचालक, महावितरण कंपनी, प्रकाशगड, मुंबई | - | सदस्य, |
| मुख्य अभियंता,(पारेषण), महापारेषण कंपनी, प्रकाशगड, मुंबई | - | सदस्य, |
| सह आयुक्त, साखर आयुक्तालय, पुणे | - | सदस्य |
| मुख्य अभियंता, वसंतदादा शुगर संस्था, पुणे | - | सदस्य |
| महाव्यवस्थापक (ऊ. नि.-२), महाऊर्जा, पुणे | - | **सदस्य सचिव** |

सदरहू समितीने वर नमूद केल्यानुसार सहवीज निर्मिती प्रकल्पांचा आढावा घेऊन त्याबाबतचा सविस्तर अहवाल आपल्या सुस्पष्ट शिफारशींसह शासनास सादर करावा.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५११२०११३७३०१७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rohini P Jadhav

Digitally signed by Rohini P Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOURS DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=12646d8130730515a2533ddd2b46b2c82ca9b32dbbcd3d60f21e82f7cc2ee090, cn=Rohini P Jadhav
Date: 2015.12.01 13:22:03 +05'30'

**( रो. प्र. जाधव )**
**शासनाच्या अवर सचिव**

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई .
२. मा. मंत्री, ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ..
३. प्रधान सचिव (सहकार), सहकार, वस्त्रोद्योग व पणन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सुत्रधार कंपनी मर्या., मुंबई.
५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., मुंबई.
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या., मुंबई.
७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या., मुंबई.
८. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे.
१०.सदरहू समितीचे अध्यक्ष, सर्व सदस्य आणि सदस्य सचिव.
११.निवड नस्ती-ऊर्जा-७ कार्यासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.